# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १५/०१/२०२५ (बुधवार) सकाळ**

## गांजा तस्करी करणारे आरोपी गांजासह सावनेर पोलीसांच्या ताब्यात

पोस्टे सावनेर:—दिनांक १५/०१/२०२५ रोजी पोस्टे सावनेर येथील स्टाफ हे पोस्टे हद्दीत पेट्रोलींग करीत असता गोपनीय माहिती मिळाली की, मौजा हेटी शिवार हेटी पाटनसावंगी परिसरात काही इसम कार द्वारे अंमली पदार्थ गांजा बाळगुन वाहतूक करीत आहे. अशा माहिती वरून स्टाफ यांनी मौजा हेटी शिवार हेटी पाटनसावंगी परिसरात नाकाबंदी करून स्वीफ्ट डीझायर गाडी क्रमांक MP-48-ZC-4665यास थांबवुन पाहणी केली असता कारचा चालक **०१) सरवन सिंग संतोख सिंग, वय ३८ वर्ष रा. भगगुढाणा विवेकानंद वार्ड नं. ३३ बैतुल मध्यप्रदेश व त्याचा साथीदार क्रमांक ०२) अर्जुनसिंग गणेषप्रसाद महतो वय ४४ रा. शिवाजी वार्ड चौकीपुरा प्लाट नं. ०३ बैतुल बाजार बैतुल मध्यप्रदेश** हे मिळुन आले त्यांच्या चारचाकी स्वीफ्ट डीझायर गाडी क्रमांक MP-48-ZC-4665 झडती घेतली असता आरोपीच्या ताब्यातुन ०१) एकुण ६२ ग्रॅम अंमली पदार्थ गांजा कींमती अंदाजे ६२०/— रू मिळुन आला. २) एक पांढऱ्या रंगाचा सॅमसंग कंपनीचा गॅलेक्सी २१ एस मोबाईल किंमती अंदाजे १००००/—रू, ०३) नगदी ५१,०००/— रू. ४) ओप्पो कंपनीचा मोबाईल.किमती अंदाजे १००००/— रू ०५) एक पांढ—या रंगाची स्वीफ्ट डीझायर गाडी क्रमांक MP-48-ZC-4665कींमती अंदाजे ५,००,०००/— रू ६) एक ग्रे रंगाची JPI कंपनीची खाली सुटकेस ज्यामध्ये अंमली पदार्थ गांजाचे अवशेष असलेली किंमती १०००/—रू. ७) एक निळया रंगाची RUSH कंपनीची खाली सुटकेस किमती १०००/—रू. ८) एक लाकडी बेसबॉल बॅट १००/—रू. ९) एक सिल्वर काळया रंगाचा फोल्डींग चाकु ज्याची संपुर्ण लांबी १४ सेमी ज्याचे पाते ०७ सेमी व मुठ ०७ सेमी किंमती १००/—रू. १०) एक काळया रंगाचा फोल्डींग चाकु ज्याची संपुर्ण लांबी १५.५ सेमी ज्याचे पाते ०७ सेमी व मुठ ०८.५ सेमी किंमती १००/—रू. असा एकुण ५,७३,९२०/— रू चा मुद्देमाल आरोपीतां कडुन जप्त करण्यात आला. आरोपीतांविरूद्ध पोस्टे सावनेर येथे कलम 8,20(C),20(B) iiA,29 NDPS Act अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## अवैधरीत्या गांजा (मादक पदार्थ) च्या  गुन्हयात पाहीजे आरोपीला पोलीसांनी केले अटक

पोलीस स्टेशन देवलापार :— दिनांक ३१/१२/२०२४ रोजी पोस्टे देवलापार येथे आरोपी नामे—हलीम उर्फ रंगा फरीद शेख वय ४३ वर्षेरा. मोरफाटा दर्गा ह.मु. खवासा टुरीया रोडचे बाजुला ता. कुरई जि.सिवनी (म.प्र) त्याचे मालकीचे फुलचादरचे दुकानात मोरफाटा दर्गा चे समोर अवैधरित्या गांजा बाळगुन मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन  प्लास्टीक थैलीमध्ये ०४ मोठया व १३ छोटया पुडयामध्ये ०.१०२ किलो ग्राम किंमती १०२०/—रू चा गांजा जप्त करण्यात आला होता.आरोपी विरुध्द पोस्टे देवलापार येथे कलम ८ (क), २०(ब) गुंगी कारक औषघद्रव्य आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयात नामे—हलीम उर्फ रंगा फरीद शेख वय ४३ वर्षेरा. मोरफाटा दर्गा ह.मु. खवासा टुरीया रोडचे बाजुला ता.कुरई जि.सिवनी (म.प्र)  अटक करण्यात आली होती.**देवालापार पोलीस पुढील तपास करीत असतांना सदर गुन्हयात अजुन आरोपी असल्याची माहीती मिळल्याने देवलापार पोलीसांनी गुप्तबातमीदार आणि तांत्रिक पध्दीतीने तपास करीत आरोपी अमर उर्फ जॉनी दुर्गाप्रसाद उईके  याचा सहभाग असल्याचे निष्पन्न केले. आज रोजी देवलापार पोलीसांनी आरोपी अमर उर्फ जॉनी दुर्गाप्रसाद उईके  वय ३० वर्षे ,रा बारापत्थर खवासा राज्य मध्यप्रदेश याला अटक केली आहे.देवलापार पोलीस पुढील तपास करीत आहेत.**

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर